**वादी तर्फे उलटतपास – श्री. ए. एस. फराकटे वकील.**

**२४.** माझे दहावी पर्यंतचे शिक्षण झालेले असून मी त्याबाबतचा दाखला सादर केलेला आहे. हौसाबाई ही ज्ञानोबाची पत्नी असून वादी क्र.२ व प्रतिवादी क्र.२ ही त्यांची मुले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.३ ही मारुती उसनकर यांची मुलगी आहे. प्रतिवादी क्र.३ चे माहेर कोळींद्रे असून तिच्या आईचे नाव कमळाबाई आणि वडिलांचे नाव मारुती उसनकर आहे.

**२५**. मला दाव्यातील घर, शेत व जंगम मिळकतींबाबत माहिती आहे. प्रतिवादी क्र.१ च्या वडिलांचे नाव बाळकू तेजम असून ते १९४४ साली वारले आहेत. बाळकूची पत्नी धोंडूबाई होती. हे म्हणणे खरे नाही की, बाळकू व धोंडूबाईला प्रतिवादी क्र.१ हा एकमेव मुलगा होता. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकती या बाळकू पासून प्रतिवादी क्र.१ कडे आलेल्या मिळकती आहेत.

**२६**. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ ने कोणतीही दावा जमीन अथवा घर मिळकत विकत घेतलेली नाही. प्रतिवादी क्र.१ ने गट क्र.३६२, १४२, १५३ व १३२ च्या मिळकती पैसे भरुन विकत घेतलेल्या आहेत. मला त्याने सदर मिळकती कोणत्या साली पैसे भरुन खरेदी केल्या आहेत याबाबत सांगता येणार नाही. आज रोजी माझ्याकडे प्रतिवादी क्र.१ ने पैसे भरुन खरेदी केल्याच्या पावत्या उपलब्ध नाहीत. साक्षीदार सांगते, त्या पावत्या मिळाल्यास एक महिन्यामध्ये सादर करु शकते.

**२७**. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ शेती व्यतिरिक्त इतर कोणताही व्यवसाय करत नव्हता. प्रतिवादी क्र.१ शेतकरी होता. मला प्रतिवादी क्र.१ शेती व्यतिरिक्त इतर कोणता व्यवसाय करत होता याबाबत सांगता येणार नाही. दावा मिळकती या चांगल्या प्रतीच्या असून त्यामध्ये ऊस, भुईमूग व भाताचे उत्पन्न घेतले जाते.

**२८**. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.१ ची सुरुवाती पासून आर्थिक परिस्थिती चांगली होती. त्याने शेतीसाठी १५०० फूट पाईपलाईन करुन विद्युतपंप बसविलेला होता. तो शेतीतून मिळणा–या उत्पन्नातून शेतीसाठी संपुर्ण खर्च करत होता. हे म्हणणे खरे नाही

की, त्याने शेतीसाठी महिंद्रा कंपनीचा ट्रॅक्टर व दोन ट्रॉल्या घेतल्या होत्या. प्रतिवादी क्र.१ हा दि.२१.०५.२०२१ रोजी मयत झाला आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ हा वादी व प्रतिवादी क्र.२ सोबत एकत्रीत राहून शेतजमिनी कसत होता.

**२९**. प्रतिवादी क्र.१ ने सदर दाव्यास चराटी वकिलां मार्फत नि. क्र.१९ प्रमाणे लेखी कैफियत दाखल केली होती. आता मला दाखवलेल्या नि. क्र.१९ वरती प्रतिवादी क्र.१ ची एकटयाची स्वाक्षरी आहे. मी या दाव्यात सुरुवातीपासून प्रतिवादी क्र.४ आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ ने लेखी कैफियत देतेवेळी मी या दाव्याकामी हजर झाले नव्हते. मी दाव्यात हजर झाल्यानंतर प्रतिवादी क्र.१ ने दिलेली लेखी कैफियत नि. क्र.२२ च्या पुरसीसीद्वारे मान्य केली आहे.

**३०**. हौसाबाईने प्रतिवादी क्र.१ च्या विरोधात पोटगीसाठी कि. अर्ज क्र. २/१९७७ प्रमाणे प्रकरण दाखल केले होते. मला ते प्रकरण प्रतिवादी क्र.१ ने लेखी जबाब दाखल करुन चालवल्याची माहिती नाही. मी या दाव्यातील सर्व कागदपत्रांची माहिती घेतलेली आहे. आता मला दाखवलेल्या प्रतिवादी क्र.१ ने कि. अर्ज क्र.२/१९७७ मध्ये दिलेल्या लेखी म्हणण्याच्या प्रतीवरती त्याची स्वाक्षरी आहे किंवा नाही याबाबत सांगता येणार नाही. मला सदर लेखी जबाबात प्रतिवादी क्र.१ ने त्याचे प्रतिवादी क्र.३ सोबत दुसरे लग्न केल्याची बाब नाकारल्याची माहिती नाही.

**३१**. हे म्हणणे खरे नाही की, वादी क्र.१ ची प्रतिवादी क्र.१ ने प्रतिवादी क्र.३ सोबत गैरसंबंध ठेवून तिला त्रास दिल्याची तक्रार होती. वादी व प्रतिवादी क्र.१ आणि २ हिंदू–मराठा समाजाचे आहेत. प्रतिवादी क्र.१ चे प्रतिवादी क्र.३ सोबत दि.१२.१२.१९७६ रोजी दुसरे लग्न झालेले आहे. मला त्यावेळी वादी क्र.१ ही प्रतिवादी क्र.१ ची पत्नी असल्याबाबत माहिती नाही. मी न्यायालयात आल्यापासून वादी क्र.१ व २ आणि प्रतिवादी क्र.२ यांना प्रतिवादी क्र.१ ची पत्नी व मुले असल्याचे पाहत आहे.

**३२**. प्रतिवादी क्र.१ सन २०२१ पर्यंत न्यायालयात येत होता. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ ने त्याच्या लेखी कैफियतीमध्ये १९७६ साली प्रतिवादी क्र.३ सोबत लग्न

केल्याचा मजकूर लिहिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.३ ही प्रतिवादी क्र.१ ची पत्नी नसल्यामुळे मी व प्रतिवादी क्र.५ ते ८ त्यांची मुले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.३ ने प्रतिवादी क्र.१ च्या हयातीपर्यंत त्याच्या विरोधात तिच्या वैवाहिक हक्काबाबतचा कोणताही दावा दाखल केला नव्हता. मला प्रतिवादी क्र.३ ने वैवाहिक हक्काबाबत प्रतिवादी क्र.१ विरोधात दाखल केलेल्या दाव्याचा क्रमांक तसेच त्याचा निकाल कधी व काय झाला याबाबत सांगता येणार नाही.

**३३**. मी केवळ माझ्यासाठी साक्ष देत आहे. मी प्रतिवादी क्र.३ ची ईच्छा असल्यास तिची साक्ष नोंदवणार आहे. मला दि. दा. क्र.१११/२००० बाबत माहिती आहे. सदर दाव्यास वादी क्र.१ व २ पक्षकार नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ ने आमच्याशी संगनमत करुन दि. दा. क्र.१११/२००० चा खोटा निकाल मिळवला आहे. मी कूळकायदा प्रकरण क्र.१३५/१९६० आणि ३२४/१९६० चे निकाल पाहिलेले नाहीत. सर्वे क्र.१८३ चा आज गट क्र.३६२/२ झालेला असून सदर मिळकत रानडेंच्या मालकीची होती.

**३४**. हे म्हणणे खरे नाही की, सदर मिळकत पुर्वीपासून कूळ म्हणून प्रतिवादी क्र.१ च्या वडिलांच्या ताब्यात होती. सदर मिळकत ही प्रतिवादी क्र.१ चे चुलत चुलते धोंडिबा लक्ष्मण तेजम यांच्या पासून आलेली आहे. मला सदर मिळकत धोंडिबा तेजम यांच्याकडे कधीपासून कूळाने कसण्यास होती याबाबत माहिती नाही. धोंडिबा तेजम अविवाहित असल्यामुळे सदर मिळकत प्रतिवादी क्र.१ कडे आली होती. हे म्हणणे खरे नाही की, सदर मिळकतीची कूळाची रक्कम प्रतिवादी क्र.१ ने भरलेली नाही. मी सदर मिळकतीची प्रतिवादी क्र.१ ने कूळाची खरेदी रक्कम भरल्याच्या पावत्या मिळाल्यास एक महिन्यामध्ये दाखल करु शकते.

**३५**. मला गट क्र.१३२, १४२ व १५३ बाबत माहिती आहे. त्यांचे अनुक्रमे पुर्वी सर्वे क्र.५६, ६७ व ५३ होते. हे म्हणणे खरे नाही की, सदर मिळकत बाळकूच्या घराण्याची कूळहक्काची जमीन आहे. सदर मिळकती पुर्वी नारायण सखाराम सामंत. रा. बांदा, ता. बांदा, जि. सिंधुदुर्ग यांच्या मालकीच्या होत्या. सदर मिळकती पुर्वीपासून धोंडिबा लक्ष्मण

तेजम याच्याकडे कूळाने आलेल्या होत्या. त्याला कोणीही वारस नसल्यामुळे त्या प्रतिवादी क्र.१ कडे आलेल्या होत्या. मी सदर मिळकतींची कूळ खरेदीची रक्कम प्रतिवादी क्र.१ ने भरल्याच्या पावत्या मिळाल्यास सादर करु शकते.

**३६.** मला धोंडिबा तेजम याने प्रतिवादी क्र.१ ला सदर मिळकतींची खरेदी-विक्री, गहाण हस्तांतर अथवा तबदील केल्याबाबतची माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, वरील सर्व मिळकती प्रतिवादी क्र.१ हा पुर्वीपासून एकत्र कुटुंबा करीता वहिवाटीत होता. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ ची गट क्र.१३२, १४२, १५३ आणि ३६२/२ मध्ये वहिवाट होती. वादींनी दावा दाखल करण्याच्या तारखेपर्यंत प्रतिवादी क्र.१ ची सदर मिळकतींमध्ये वहिवाट नव्हती.

(न्यायालयीन कामकाजाची प्रथम सत्राची वेळ संपल्यामुळे उलट तपास पुढील तारखे पर्यंत तहकूब.)

**उलट तपास अपुर्ण.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

(आर. पी. थोरे)

दिनांक – २५.०२.२०२५.

दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.